**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. देवेंद्र शांतीलाल जैन
मनिषा स्टिल फर्निचर, शिवाजी चौक,
मु.केडगांव स्टे. ता. दौंड, जि. पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपील क्र.५०९**
**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक
जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक

**अपील क्र.१५९**
**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी कळवण,
कळवण उपविभाग, नाशिक

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार देवळा, ता.देवळा, जि. नाशिक

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५०९+१५९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ११.१०.२००७ व २१.५.२००८ |

**३. उपस्थित (२१.५.२००८)**

**अपीलकर्ता** श्री. देवेंद्र शांतीलाल जैन,
मनिषा स्टिल फर्निचर, शिवाजी चौक, मु.केडगांव स्टे. ता. दौंड, जि. पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपविभागीय अधिकारी, कळवण, कळवण उपविभाग, नाशिक
प्रतिनिधी श्री.पी.डी.मोरे

**जन माहिती अधिकारी** तथा तहसीलदार देवळा, ता.देवळा, जि. नाशिक
प्रतिनिधी श्री.आर.व्ही.देशमुख

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ (अ.क्र.५०९)<br>दि.८.५.२००६ (अ.क्र.१५९) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ६.३.२००६ (अ.क्र.५०९)<br>दि.२२.५.२००६ (अ.क्र.१५९) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.३.२००६ (अ.क्र.५०९)<br>दि.१२.६.२००६ (अ.क्र.१५९) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २६.४.२००६ (अ.क्र.५०९)<br>दि.१५.७.२००६ (अ.क्र.१५९) |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

१. तलाठी, दहीवड यांना केरोसीन परवान्याचे अभिलेखाची तपासणी करणेकरिता दिलेला आदेश दि. १५.७.२००५ ची प्रत
२. शासन परिपत्रक क्र.रॉकेल २१९३/१०९७ प्र.क्र.३३९०,ना.पु.२७ दि.२१ जुलै २०००ची प्रत
३. शासन निर्णय क्र.रॉकेल १९०२/४२९६ प्रक्र ३३९० ता.पु/२७, दि.१०.८.२००५ ची प्रत
४. तहसीलदार देवळा यांचे पत्र क्र.पुरवठा/कावि/२४८/२००५, दि.१.८.२००५ ची प्रत
५. नोटीस क्र.पुरवठा कक्ष/८(३)२५१६ २००५, दि.१६.८.२००५ प्रत
६. दिलीप शांतीलाल जैन लेखी खुलाशाचे पत्राची नक्कल
७. ३४४ लीटर केरोसीन तफावत कशी, लेखी खुलासा करावा
८. गेरसीलाल जैन व एकनाथ शंकर अलाई यांना १५.७.२००५ रोजी देवळा तहसीलदार यांनी नोटिसीप्रमाणे कोणती कारवाई केली त्याची प्रत.
९. रजिस्टर रॉकेल स्टॉक माहे जून व जुलै २००५ च्या नकला मिळाव्यात.
१०. परवाना नूतनीकरण फी देवळा तहसीलदार यांचे सहीने स्टेट बँकेत चलन भरले चलन प्रत
११. नूतनीकरण फी भरलेनंतर किती दिवसात नूतनीकरण होत त्या आदेशाची प्रत
१२. जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दि.१४.११.२००५ चे पत्रावर कोणती कारवाई केली.

## विवेचन

अपीलकर्ता श्री.देवेंद्र शांतीलाल जैन यांनी श्री.दिलीप शांतीलाल जैन, रा.दहीवड, ता.देवळा यांच्या केरोसीन दुकानाच्या तपासणीच्या व चौकशीच्या संदर्भात १२ मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, देवळा, जि.नाशिक यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार देवळा, जि.नाशिक श्री.के.एस.म्हसाणे यांनी ही माहिती न दिल्यामुळे श्री.जैन यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण, भाग कळवण, जि.नाशिक यांच्याकडे अपील केले. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ नुसार केलेला हा अर्ज व अपील होते. त्यानंतर केंद्रिय अधिनियम अंमलात आल्याने त्यानुसार श्री.जैन यांनी अपील केले. तहसीलदार, देवळा यांनी कार्यालयीन पत्रव्यवहार करुन श्री.जैन यांना दि.९.९.२००५ रोजी माहिती दिली असल्याचे कळविले. परंतु ही माहिती अपुरी असल्यामुळे श्री.जैन यांनी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण यांच्याकडे अपील केले. श्री.जैन यांनी मागितलेल्या १२ पैकी ७ मुद्दयांची माहिती श्री.म्हसाणे, तहसीलदार, देवळा यांनी दिली नव्हती, असा निष्कर्ष अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण यांनी काढला व ही माहिती देण्याचा आदेश दि.१५.७.२००६ रोजी दिला. अपूर्ण माहिती मिळाली असल्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.के.एस.म्हसाणे यांच्यावर शास्तीसह कारवाई करावी, या मागणीसाठी श्री.जैन यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.२२.५.२००६ रोजी नोंदणीकृत टपालाने जन माहिती अधिकाऱ्यांनी पाठविलेल्या ४३ पानांच्या माहितीसाठी रु.४४१/- शुल्क घेतले. अतिरिक्त शुल्क परत पाठविण्याचे मान्य करुनही जन माहिती अधिकारी यांनी आतापर्यंत ते परत केलेले नाही, असे श्री.जैन यांनी दि.२१.५.२००८ रोजी आयोगापुढे सादर केलेल्या सुनावणीत नमूद केले.

संबंधित केरोसीनपरवाना अपीलकर्ता श्री.जैन यांचे बंधू श्री.दिलीप शांतीलाल जैन यांच्या नांवावर होता व गैरव्यवहार व अनियमितता आढळल्यामुळे त्यांचा परवाना रद्द करण्यात आला होता. श्री.दिलीप जैन यांनी या परवान्यासंदर्भात अनेक पातळ्यांवर स्वतंत्रपणे दाद मागितली आहे. तसेच श्री.देवेंद्र जैन माहितीच्या अधिकाराखाली व अन्य प्रकारचे अर्ज करीत आले आहेत.

'अर्धन्यायिक प्रकरण म्हणून कायदेशीररीत्या प्रकरण चालू असताना व त्यावर त्या त्या पातळीवर निर्णय प्रलंबित असताना परवानाधारकाने स्वत:च्या भावाच्या नावाने माहिती अधिकाराखाली अर्ज केल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषत: अर्धन्यायिक प्रकरणावर प्रभाव टाकण्यासाठी व आपल्याला सोयीस्कर असा निर्णय लावून घेण्यासाठी अशा स्वरुपाची कार्यवाही परवानाधारक व त्यांचा भाऊ करत असल्याचे सुनावणीचे वेळी निदर्शनास आल्यामुळे अर्जदाराची मागणी न्याय्य नाही, ही बाब निदर्शनास आणून देण्यात येत आहे', असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांनी आयोगाला सादर केलेल्या लेखी निवेदनात नमूद केले आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री.म्हसाणे यांनी विहित मुदतीत माहिती दिलेली नाही. प्रथम अपिलाच्या सुनावणीला व आयोगापुढील सुनावणीलाही ते उपस्थित राहिले नाहीत. प्रथम अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार विहित मुदतीत त्यांना संपूर्ण माहिती देणे आवश्यक होते, त्याची पूर्तता केलेली नाही. त्यांच्यानंतर तहसीलदारपदी आलेले श्री.सी.के.वैष्णव यांना सर्व माहिती दिली असल्याचे अपीलकर्त्याने लेखी व तोंडी नमूद केले, मात्र द्यावयाची राहिलेली अतिरिक्त शुल्काची रक्कम व अन्य माहिती मिळावी आणि तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती व्हावी, अशी मागणी अपीलकर्त्याने केली.

याच संदर्भात श्री.जैन यांनी दि.३१.१.२००६ रोजी जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांच्याकडे माहिती मागितली होती. अपुरी व चुकीची माहिती मिळाल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी व अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे अपील केले, अपिलीय प्राधिकाऱ्यांनी ते फेटाळले.

जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती त्यांनी विहित मुदतीत दिली, तसेच त्यातील सहा मुद्दे तहसीलदार, देवळा यांच्या कक्षेतील माहितीसंबंधीचे होते. संबंधित माहिती त्यांच्याकडून मागवावी असे जन माहिती अधिकारी तथा तत्कालीन जिल्हा पुरवठा अधिकारी श्री.रामचंद्र पवार यांनी त्यांना कळविले. या संदर्भातील सर्व मुद्दे तत्कालीन अप्पर जिल्हाधिकारी, नाशिक श्री.शेखर गायकवाड यांनी तपासून श्री.जैन यांचे अपील फेटाळले. श्री.गायकवाड यांचा हा निर्णय योग्य आहे.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणीस अनुपस्थित असल्याबद्दल स्वयंस्पष्ट खुलासा सादर करावा, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी उपस्थित प्रतिनिधींना दिले होते. त्यानुसार त्यांनी सादर केलेला खुलासा मान्य करण्यात येत आहे. तसेच आयोगाने सुनावणीच्या वेळी नुकसानभरपाइचा मुद्दा विचारात घेतला होता. संबंधित अधिकारी उपस्थित नसल्याचे त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास आयोगाने मुदत दिली. त्यानुसार त्यांनी दिलेले स्पष्टीकरण, उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे व निवेदने यांचा विचार करता नुकसानभरपाई देणे आवश्यक नसल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

अपील क्र.१५९ मध्ये व अपील क्र.५०९ मध्ये अंतर्भूत असलेल्या मुद्दयांच्या संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री.के.एस.म्हसाणे (सध्या तहसीलदार, मालेगाव) यांनी माहिती मागणीच्या अर्जाची दखल घेण्यास केवळ विलंबच लावला आहे, असे नव्हे, तर माहिती नाकारण्याची भूमिका घेतली आहे, असे सादर करण्यात आलेली कागदपत्रे व अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण श्री.जे.एस.काकुस्ते यांनी दि.७.३.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनावरुन सिध्द होते. त्यामुळे श्री.म्हसाणे शास्तीस पात्र ठरतात.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील क्रमांक १५९ मान्य. अपील क्रमांक ५०९ अमान्य.

(२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार श्री.के.एस.म्हसाणे यांनी माहिती विलंबाने व अपुरी देऊन पर्यायाने नाकारली आहे. त्याबद्दल श्री.के.एस.म्हसाणे यांना रु.२५०००/- शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या जुलै महिन्यात मिळणाऱ्या जून महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती दि.१५.७.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा

करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवापुस्तकात याबाबत नोंदी घेऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि. २५.७.२००८ पर्यंत सादर करावा.

(३) अपीलकर्त्यास द्यावयाची राहिलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, देवळा यांनी दि.२५.५.२००८ पर्यंत व नि:शुल्क द्यावी, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. त्याचा पूर्तता अहवाल हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

(४) माहितीसाठी आकारलेल्या शुल्काची तपासणी अपिलीय प्राधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, कळवण यांनी करुन अतिरिक्त शुल्क आकारले असल्यास ते अपीलकर्त्यास परत करावे, याचा पूर्तता अहवाल हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे

पुणे
दि.२४.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.काशिनाथ त्रिंबक साने
रा.१११, गुरुवापेठ, पुणे ४११००२ — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४१+१०३१ / पुणे /२००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१.२००८ |

**३. उपस्थित**

श्री.काशिनाथ त्रिंबक साने
रा.१११, गुरुवापेठ, पुणे ४११००२

**अपिलीय प्राधिकारी** तथा विशेष पोलीस महानिरीक्षक,
राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे प्रतिनिधी श्री.किरण रामचंद्र शेलार

**जन माहिती अधिकारी** तथा पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा,
गुन्हे अन्वेषण विभाग, म.रा.पुणे / नाशिक श्री.किरण रामचंद्र शेलार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.७.२००६ (अ.क्र.५४१)<br>दि.१७.१.२००७ (अ.क्र.१०३१) |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.८.२००६ (अ.क्र.५४१)<br>दि.२८.२.२००७ (अ.क्र.१०३१) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९.९.२००६ (अ.क्र.५४१)<br>दि. ४.६.२००७ (अ.क्र.१०३१) |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १७.१०.२००६ (अ.क्र.५४१)<br>दि. १३.४.२००७ (अ.क्र.१०३१) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अप्पर पोलीस महासंचालक राज्य गुन्हे अन्वेषण शाखा, म.रा.पुणे ह्यांचेकडील पत्र क्र.अेससीआरबी/के.माअ/साने/८३०६/२००६, दि.१६/१७ ऑक्टोबर २००६ नुसार केलेले मुद्देवजा बाबीचे विवरणाची माहिती. | |

## विवेचन

संचालक, वर्ग-१, अंगुली मुद्रा केंद्र, गणकयंत्र विभाग, मुंबई हे अस्थायी पद पदोन्नतीने का भरण्यात आले नाही याबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.काशिनाथ त्रिंबक साने यांनी जन माहिती अधिकारी तथा पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्यामुळे श्री.साने यांनी अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी श्री.साने यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांवर स्पष्टीकरणात्मक निवेदनासह माहिती दिली, परंतु अतिरिक्त पदाचा कार्यभार सहा महिन्यापर्यंत देण्याचे अधिकार प्रशासकीय अधिकारी यांना आहेत, त्यानंतर शासनाची पूर्वपरवानगी घ्यावी लागते अशा पूर्वपरवानगीची सत्यप्रत आपल्याला मिळावी व अभिलेख नष्ट केले असतील तर ते नष्ट केल्याचा दाखला नोंद पुस्तिकेनुसार साक्षांकित प्रतीत मिळावा, अशी मागणी श्री.साने यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात केली आहे. सदरचे अपील हे महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ नुसार दाखल केलेले होते, तरीही आयोगाने हे अपील दाखल करुन घेतलेले आहे.

श्री.साने हे अंगुली मुद्रा केंद्रात सेवेत होते. संचालक, अंगुली मुद्रा केंद्र, गणकयंत्र विभाग हे पद पदोन्नतीने न भरता अतिरिक्त कार्यभार देण्यात आल्यामुळे आपल्यावर अन्याय झाला, असे त्यांचे म्हणणे आहे. या संदर्भात ते सातत्याने माहितीच्या अधिकारात व प्रशासकीय पातळीवर अर्ज करीत आले आहेत. शासनाने दि.१७.२.२००७ च्या पत्रान्वये त्यांची विनंती अमान्य केली आहे. त्यापूर्वी श्री.साने यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्याकडे केलेल्या याचिकेमध्ये त्यांना

, वर्ग-२ या पदावर मानीव दिनांक देण्याबाबतचे आदेश न्यायाधिकरणाने दिले होते. श्री.साने ८ साली सेवानिवृत्त झाले व न्यायाधिकरणाच्या निर्णयानुसार शासनाने सन १९९९ मध्ये त्यांना सर्व अनुषंगिक फायदे दिले आहेत. दि.१७.१.२००८ रोजी या अपिलाची सुनावणी घेतली, त्यावेळी तपशीलवार अभ्यास करुन निवेदन सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदत देण्याची विनंती पोलीस अधीक्षक, गुन्हे अन्वेषण विभाग, नाशिक श्री.किरण शेलार यांनी केली. आयोगाने एक महिन्याची मुदत दिली. श्री.साने यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे संचालक, वर्ग-१ या पदासाठी केलेली मागणी शासनाने अमान्य केली आहे. श्री.शेलार यांनी दि.१८.२.२००८ च्या निवेदनाद्वारे तपशीलवार अहवाल आयोगाला सादर केला आहे.

अपील क्र.१०३१ च्या संदर्भात संचालक, पोलीस अधीक्षक, तांत्रिक सेवा, गुन्हे अन्वेषण विभाग,पुणे यानी सादर केलेल्या सविस्तर निवेदनाची प्रत अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि.२७.३.२००८ (प्राप्त दि.३१.३.२००८) रोजी आयोगाला सादर केली असून सेवाज्येष्ठतेनुसार संचालक, वर्ग-१ या पदाचा मानीव दिनांक देण्याच्या श्री.साने यांच्या मागणीसंबंधात तपशीलवार स्पष्टीकरण दिले आहे.

शासनाने वेळोवेळी दिलेले स्पष्टीकरण श्री.साने यांना मान्य नाही. श्री.साने यांनी यापुढे या विषयावर अर्ज सादर करु नयेत, सादर केल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही, असे त्यांना कळवावे, असे पोलीस उपमहानिरीक्षक (प्रशासन) पोलीस महासंचालक यांचेकरीता श्रीमती रश्मि शुक्ला यांनी अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना दि.११.४.२००७ च्या पत्रान्वये कळविले असून, श्री.बो.था.न्हिंगलोव्हा, अपर पोलीस अधीक्षक यांनी दि.१६.४.२००७ च्या पत्रान्वये श्री.साने यांना हे कळविले आहे. दि.१.४.१९८५ ते ३१.७.१९८९ या कालावधीतील अभिलेख उपलब्ध नसल्याचा सर्व पत्रव्यवहारात उल्लेख आहे. हा पत्रव्यवहार उपलब्ध होऊ शकतो का, हे तपासण्याचे श्री.शेलार यांनी मान्य केले. अभिलेख नष्ट केले असल्यास नोंद पुस्तकातील दाखला श्री.साने यांनी साक्षांकित करुन दिला जावा, ही श्री.साने यांची मागणी रास्त आहे. अतिरिक्त कार्यभार देण्याचा निर्णय चूक की बरोबर, असा कार्यभार का दिला, हा निष्कर्षाचा विषय असून माहितीचा अधिकार २००५ च्या कक्षेत विचारात घेता येणार नाही. पोलीस महानिरीक्षक व महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांच्या पातळीवर त्याचा विचार पूर्वीच झालेला आहे, असे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील अमान्य.

(२) या काळातील कागदपत्रे नष्ट केली असतील तर त्याबाबतच्या अभिलेखाची साक्षांकित प्रत अपीलकर्त्यास नि:शुल्क द्यावी, असे आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला होता, त्याचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात आयोगाला सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२३.६.२००८**

१७१-०८ ८-११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.११.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५४५ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिलीप आयाचित,<br>रा. ७, राखी अपार्टमेंट, रामबाग कॉलनी,<br>पौड रस्ता, पुणे-३८ | गैरहजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | गावकामगार तलाठी, रेंगडेवाडी,<br>ता. जावली, जि. सातारा | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपविभागीय अधिकारी,<br>सातारा उपविभाग, सातारा | गैरहजर |

अपीलकर्त्याने खरेदीखतानुसार ७/१२ ला नावे लावून ७/१२ उतारा मिळावा, अशी मागणी जन माहिती अधिकारी तथा तलाठी, रेंगडेवाडी, ता. जावली यांचेकडे केली होती. सदरची बाब प्रशासकीय कार्यवाहीची असून उपलब्ध कागदपत्र पाहता प्लॉटची नोंद होऊन ७/१२ मिळणेकामी यापूर्वीचे व्यवहार दुरूस्त करणे आवश्यक दिसते. मात्र ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ३०.६.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

११.६.०८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौन्सिल हॉलसमोर,
पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१५.०५.२००८ रोजी सातारा येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलांचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५ + ५६/सातारा |
| २ | अपील कर्ता | श्री. तुकाराम बाबुराव जाधव, मु.कर्मवीरनगर, पो.एम.आय.डी.सी.सातारा, ता.जि.सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अधिक्षक, भूमी अभिलेख, ता.कोरेगाव, जि.सातारा |

अपीलकर्त्यास माहिती मिळाली असल्याने समाधान झाले असल्याचे वरील तीनही घटकांनी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. ४.०६.२००८

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नरेंद्र बाबुराव बागल
१७६३, डॉ.पी.आर.पाटील मार्ग,
परांजपे हॉस्पिटलमागे, सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
शिरोळ तहसील, जयसिंगपूर, जि.सांगली — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा चेअरमन, माता सावित्रीबाई फुले मागासवर्गीय गृहनिर्माण संस्था, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ५५/ सांगली / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख(विशेष अपील निर्गत मोहीम) | दि.१४.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.नरेंद्र बाबुराव बागल
१७६३, डॉ.पी.आर.पाटील मार्ग,
परांजपे हॉस्पिटलमागे, सांगली

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
शिरोळ तहसील, जयसिंगपूर, जि.सांगली श्री.बी.एस.कटरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२७.२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.३.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १७.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२३.६.२००६ |

| ८ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>माता सावित्रीबाई फुले दुर्बल घटक मागासवर्गीय विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर शासनाने मंजूर सभासदांना सन १९९४ साली दिलेली तीन एकर जमीन मंजूर सभासदांना मिळाली काय. सन १९९४ ते २००६ पर्यंत संस्थेत झालेल्या बेकायदेशीर कृत्याबाबत. एकूण १० मुद्दयांची माहिती. |
|---|---|

## विवेचन

माता सावित्रीबाई फुले दुर्बल घटक मागासवर्गीय विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर या संस्थेबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.नरेंद्र बाबुराव बागल यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था व तहसीलदार कार्यालय, शिरोळ यांच्याकडे मागितली. त्यांनी हा विषय सहाय्यक उपनिबंधक संस्था, शिरोळ, ता.जयसिंगपूर यांच्या कक्षेतील असल्याने अर्ज त्यांच्याकडे पाठविले. त्यांनी सन १९९७ ते २००२ या काळातील लेखा परीक्षण अहवालाच्या प्रतीसाठी आवश्यक ते शुल्क भरण्यास अर्जदारास कळविले व ऊर्वरित माहिती जन माहिती अधिकारी तथा सचीव, माता सावित्रीबाई फुले दुर्बल घटक मागासवर्गीय विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांच्याकडून घ्यावी, असे कळवून अर्ज संस्थेच्या सचिवांकडे पाठविला. संस्थेच्या सचिवांकडून व तहसीलदारांकडून माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.बागल यांनी सहनिबंधक सहकारी संस्था, जयसिंगपूर, ता.शिरोळ यांच्याकडे व जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांच्याकडे अपील केले. जिल्हाधिकाऱ्यांनी तहसीलदार हेच अपिलीय प्राधिकारी असल्याने अपील त्यांच्याकडे पाठविले व सहनिबंधकांनी अपिलाची दखल घेतली नाही, असे नमूद करुन श्री.बागल यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.बागल व संबंधित संस्था यांच्यातील वादाची पार्श्वभूमी या अपिलाला असून उभय बाजू परस्परांविरुध्द वेगवेगळ्या पातळ्यांवर अर्ज, तक्रारी, आरोप प्रत्यारोप करणारी निवेदने व न्यायालयात खटले असे गेल्या अनेक वर्षांपासून करीत आल्या आहेत, असे आयोगाला सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन दिसून येते. श्री.बागल यांनी माहितीच्या अधिकारातही अर्ज व

अपिले केली असून त्यात अधिकारी व त्यांचे अधिकार याबाबत नेमकेपणा राखलेला नाही. संस्थेत अनेक गोष्टी बेकायदेशीर घडत असून त्याबाबत कारवाई व्हावी, ही श्री.बागल यांची मुख्य मागणी आहे, तर श्री.बागल यांचे मानसिक संतुलन ढळले असून संस्थेला त्रास देण्यासाठीच ते माहितीच्या अधिकारापासून न्यायालयातील खटल्यापर्यंत अनेक मार्ग अवलंबत आहेत, असे संस्थेचे अध्यक्ष श्री.विश्वनाथ खंडू अंबपकर यांनी लेखी नमूद केले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत उभय बाजूंच्या आरोप-प्रत्यारोपांची दखल घेण्याचे कारण नाही, तसेच अपीलकर्त्याने केलेल्या आरोपांचे स्पष्टीकरण मागणे वा भाष्य अपेक्षित करणे 'माहिती'च्या व्याख्येत समाविष्ट होत नाही. मात्र अपीलकर्त्याला देय माहिती दिली गेली पाहिजे.

## आदेश

(१) अपील अमान्य.

(२) अपीलकर्ता श्री.नरेंद्र बागल यांना देय माहिती १५ दिवसात देऊन जन माहिती अधिकारी तथा सचीव, माता सावित्रीबाई फुले दुर्बल घटक मागासवर्गीय विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, जयसिंगपूर, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर यांनी आयोगाला पूर्तता अहवाल सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या दिवशीच दिला होता. सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, जयसिंगपूर, ता.शिरोळ यांनी याबाबतची कार्यवाही पूर्ण करावी व हा आदेश मिळाल्यापासून आठ दिवसात पूर्तता अहवाल सादर न केल्यास संबंधित संस्थेवर त्यांनी नियमानुसार योग्य ती कारवाई करावी.

**(विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**पुणे**
**दि.२६.६.२००८**

जूलै-०८-जून-सोलापूर